# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारतीय जनता पक्षाच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली आहे. आज मुंबईत झालेल्या पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार यांनी फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, त्याला पंकजा मुंडे, प्रवीण दरेकर, रविंद्र चव्हाण यांच्यासह इतर आमदारांनी अनुमोदन दिलं. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी निरिक्षक म्हणून या बैठकीला उपस्थित होते.

दरम्यान, नवीन सरकाचा शपथविधी उद्या मुंबईत आझाद मैदानावर होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इस्रो आज पीएसएलव्ही–सी या अंतराळ यानाचं प्रक्षेपण करणार आहे. श्रीहरिकोटात सतीश धवन अंतराळ केंद्रातून आज दुपारी चार वाजून आठ मिनिटांनी हे यान प्रक्षेपित केलं जाईल. हे अंतराळ यान युरोपीय अंतराळ संस्थेचे तीन उपग्रह पृथ्वीच्या सर्वात लांब असलेल्या कक्षेत प्रक्षेपित करणार आहे. हा उपग्रह सूर्याची सर्वात बाह्य कक्षा, तिथलं वातावरण तसंच अवकाशातल्या हवामानाचा अभ्यास करेल.

****

नौदल दिवस आज साजरा होत आहे. १९७१ मध्ये ट्रायडंट अभियानादरम्यान पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्यूत्तर देत चार पाणबुड्यांना समुद्रात बुडवण्यात भारतीय नौदलाला यश आलं होतं. या विजयाची आठवण म्हणून नौदल दिवस साजरा केला जातो. यानिमित्त पुरी इथं ब्ल्यू फ्लॅग बीच वर होणार्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी होणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नौदल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. सुरक्षितता आणि देशाच्या समृद्धीसाठी नौदलाच्या जवानांची वचनबद्धता वाखाणण्याजोगी आहे, भारताच्या समृद्ध सागरी इतिहासाबद्दल आपल्याला अभिमान असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

पंजाबचे माजी मुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर आज अमृतसर इथल्या सुवर्ण मंदीरात हल्ला झाला, ज्यात ते थोडक्यात बचावले. बादल हे अकाल तख्तच्या निर्देशानुसार सुवर्ण मंदीरात सेवादार म्हणून गेले असता, प्रवेशद्वाराजवळ त्यांच्यावर एकाने गोळी झाडली. या हल्लेखोराला ताब्यात घेण्यात आलं आहे.

****

मुंबईची ओळख असलेल्या गेट वे ऑफ इंडियाला आज शंभर वर्षं पूर्ण झाली. ब्रिटिश सम्राटांच्या भारतभेटीच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या गेट वे ऑफ इंडियानं गेल्या शंभर वर्षांमध्ये अनेक स्थित्यंतरं पाहिली, अनेक ऐतिहासिक घटनांचा तो साक्षीदार झाला.

****

गडचिरोली शहरासह अन्य तालुक्यात आणि शेजारच्या चंद्रपूर जिल्ह्यातही आज भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू तेलंगणा राज्यातल्या मुलुगु इथं असून, भूकंपची तीव्रता पाच पूर्णांक तीन रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. नागपूर इथं देखील भूकंपाचे अतीसौम्य झटके जाणवले.

****

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं २०२६-२७ या वर्षात होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी जिल्हा प्रशासनाची जोरदार तयारी सुरू आहे. काल यासंदर्भात नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सर्व शासकीय यंत्रणांची बैठक घेतली. यावेळी नाशिक महापालिकेचा प्राथमिक सुमारे अठराशे कोटींचा आराखडा, त्रंबकेश्वर नगरपालिकेचा ५२२ कोटींचा, तर बांधकाम विभागाच्या प्राथमिक चाळीस कोटी रुपयांच्या आराखड्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

****

नांदेड शहरात आनंदनगर भागात आज पहाटे नैवेद्यम हॉटेलसह जीव्हीसी मोबाईल शॉपीला आग लागली. या आगीने नैवेद्यम हॉटेलच्या वरच्या मजल्यावर असलेल्या वैष्णवी मुलींच्या हॉस्टेललाही आगीने वेढले. त्याचवेळी जवळच असलेल्या एका मोबाईल शॉपी आणि श्री महालक्ष्मी ऑईल शोरूमचंही आगीमुळे मोठं नुकसान झालं. अग्निशमन दलाने हॉस्टेलमधून मुलींची सुखरूप सुटका केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

****

छत्रपती संभाजीनगर महावितरणच्या शहर-एक विभागात अधिक वीजगळती असलेल्या वीजवाहिन्यांवरील ग्राहकांच्या तपासणीची धडक मोहीम कालपासून सुरू झाली. यात पॉवर हाऊस उपविभागात १५ ग्राहकांच्या मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी होत असल्याचं आढळून आलं. या ग्राहकांना त्यांच्या वापरानुसार निर्धारित बिले देण्यात येणार आहेत. ही बिले विहित मुदतीत न भरल्यास वीजचोरांवर थेट पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येणार असून, ही मोहीम संपूर्ण शहरात सुरू करण्यात येणार असल्याचं, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले यांनी सांगितलं.

****

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दक्षिण मध्य रेल्वेतर्फे नांदेड - दादर- नांदेड ही अनारक्षित विशेष रेल्वे चालवण्यात येणार आहे. ही रेल्वे उद्या पाच तारखेला अदिलाबाद इथून निघणार असून शनिवारी सात तारखेला दादर इथून निघेल, असं रेल्वे कार्यालयातर्फे कळवण्यात आलं आहे.

****